# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२४/००१४८६**

**अपिलार्थी श्री. महंमदअली हमजा जमादार**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहा. कक्ष अधिकारी (जपुक-२९)**
सामान्य प्रशासन विभाग, १९ वा मजला, नवीन प्रशासकीय भवन,
मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा अवर सचिव**
सामान्य प्रशासन विभाग, १९ वा मजला, नवीन प्रशासकीय भवन,
मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०९.०९.२०२५**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | अनुपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | उपस्थित |

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| १३.११.२०२३ | ०७.१२.२०२३ | १७.१२.२०२३ | - |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. ०९.०३.२०२४ रोजीच्या अर्जान्वये प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आदेश पारित केलेले नाहीत असे कारण नमूद करुन मा. मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र या कार्यालयाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. मा. मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र कार्यालयाने सदर व्दितीय अपील दि. १६.०५.२०२४ रोजीच्या पत्रान्वये राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठाकडे हस्तांतरीत केले.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. ०७.१२.२०२३ संलग्न केले आहेत.

अपिलार्थी यांनी दि. १३.११.२०२३ रोजीच्या माहिती अर्जानुसार औरंगाबाद आणि उस्मानाबाद जिल्ह्याचे नावामध्ये बदलाविषयी माहिती विचारली होती. जन माहिती अधिकारी यांनी दि. ०७.१२.२०२३ रोजी कळविले की, औरंगाबाद व उस्मानाबाद या जिल्ह्यांची नावे बदलण्याच्या प्रक्रीयेबाबत उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील नियम क्र. ८(ख) नुसार या याचिकेचा अंतिम निकाल घोषित होईपर्यंत आपणास नस्तीच्या प्रती उपलब्ध करुन देणे शक्य नाही. उच्च न्यायालयाच्या निकालानंतर आपणांस नस्तीतील कागदपत्रे व पत्रव्यवहाराच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देता येतील. अपिलार्थींचे सदर उत्तराने समाधान न झाल्याने त्यांनी दि. ०७.१२.२०२३ रोजी प्रथम अपील दाखल केले.

..२/-

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित असून जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश अभिलेखावर उपलब्ध नाहीत. जन माहिती अधिकारी यांनी पुढे असेही सादर केले की, त्यांनी त्यांचे पत्र दि. ०७.१२.२०२३ चे पत्रामध्ये ज्या प्रलंबित न्यायालयीन प्रकरणाचा उल्लेख केला होता त्या प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने अंतीम आदेश दिले आहे. त्यामुळे संबंधीत माहिती अपिलार्थींना देता येईल.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने उपलब्ध माहिती अपिलार्थींना आदेशप्राप्तीच्या १५ दिवसांत माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ७(६) अन्वये नोंदणीकृत टपालाने निशुल्क उपलब्ध करुन द्यावी.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**१) जन माहिती अधिकारी यांनी वरील विवेचनानुसार कार्यवाही करावी.**

**२) अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : १०.०९.२०२५**